शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड
रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालया समोर वजिराबाद,
नांदेड 431601

वेबसाईट :- www. zpnanded.in ई-मेल :- ssananded1@gmail.com

जा.क्र.जिपनां/शिअप्रा/ प्रा-1-अ, प्रा-19 / 400 /2026 दिनांक: 12 1 JAN 2026

प्रति,

सर्व गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, जिल्हा-नांदेड.

**विषय :-** **दिनांक 01.01.2026 रोजी प्राथमिक सेवाज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.**

**संदर्भ :-** 1. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली 2021 मधील नियम 5
2. शासन पत्र क्रं .संकीर्ण-2024/प्र.क्र 509/ आस्था-7/ दिनांक 29.11.2024

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, नांदेड जिल्हा परिषद, शिक्षण विभाग प्रा अंतर्गत विस्तार अधिकारी शिक्षण, अराजपत्रित मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षक –मराठी व उर्दू, शारीरीक शिक्षक, चित्रकला शिक्षक, उच्च श्रेणी मुख्याध्यापक, प्राथमिक शिक्षक –मराठी व उर्दू, प्राथमिक पदवीधर शिक्षक –मराठी व उर्दू, केंद्रप्रमुख, इ. संवर्गातील संदर्भ क्रं 2 मधील तरतुदीनुसार दिनांक 01.01.2026 रोजीची प्राथमिक स्वरूपातील सेवाजेष्ठता यादी www.zpnanded.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्यानुसार आपण तालुका स्तरावर केंद्रनिहाय एक दिवसीय कॅम्प घेवून सेवाज्येष्ठता यादीवर आक्षेप घेणे, त्यावर संबंधितांची स्वाक्षरी घेणे , यादीतील मयत, पदोन्नती झालेले, आंतर जिल्हा बदलीने इतर जिल्हयात गेलेले, सेवानिवृती झालेले, स्वेच्छानिवृती घेतलेले शिक्षक व इतर कारणावरून दिनांक 01.01.2026 रोजी कार्यरत नसलेले शिक्षक इ.शिक्षक व अधिकारी यांची नावे यादीतून वगळण्यात यावीत.

आंतर जिल्हा बदलीने जिल्हयात आलेले, नविन नियुक्तीने नियुक्त झालेले शिक्षक, जे शिक्षक कार्यरत आहेत तथापि त्यांची यांची नावे सेवाज्येष्ठता सूचीत समाविष्ट नाहीत अशा शिक्षकांची नावे सदर सेवाजेष्ठता सूचीत समाविष्ट करण्यात यावीत.

सेवाज्येष्ठता सूचीत घेण्यात आलेल्या नोंदी संबंधिताच्या सेवापुस्तिकेतून घेण्यात याव्यात. सर्व शिक्षकांची माहिती अचूक असल्याबाबत खात्री करण्यात यावी. सर्व केंद्रप्रमुख यांचे त्यांच्या संकुलातील शिक्षकांची माहिती अचूक असल्याबाबत प्रमाणपत्र आपले स्तरावर घेवून जतन करण्यात यावे. सदर सेवाजेष्ठता सूचीत गटातील एकाही शिक्षकाचे नाव सेवा जेष्ठता यादीत सुटलेले नाही, बदलीने शिक्षकांच्या पदस्थापनेत बदल झालेला असल्या पदस्थापनेचे ठिकाण दुरुस्त करावे व माहिती अचूक असल्याबाबत संबंधित गटशिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित करून द्यावे.

तालुक्यातील एकाही शिक्षक/दिव्यांगाची नावे यादीत समाविष्ट होण्यापासून वंचीत राहणार नाही याची दक्षता घ्यावी. यादीतील नोंदीबाबत कोणत्याही चुका किंवा चुकीची माहितीची नोंद होणार नाही याबाबत दक्षता घेणे व चुकीची माहिती नोंदवली असेल तर त्याबाबत जबाबदारी निश्चित करून कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल.

सदर सेवाजेष्ठता सूची ही विस्तार अधिकारी शिक्षण -श्रेणी-2 वर्ग-3, कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी ,श्रेणी-3 वर्ग-3, केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक, उच्चश्रेणी मुख्याध्यापक या पदाच्या पदोन्नती करिता वापरावयाची आहे. करिता आपणास सक्त ताकीद देण्यात येते की, सर्व संवर्गातील अंतर्भूत कर्मचा-यांची माहिती अचूक देण्यात यावी भविष्यात निर्माण होणा-या समस्येस आपणास व्यक्तीश ग्राहय धरण्यात येईल याची गंभीरतेने नोंद घ्यावी.

सदर सेवाजेष्ठता यादी ही संकेत स्थळावर उपलब्ध केलेली असल्यामुळे सर्व कर्मचारी यांनी आपआपली माहिती तपासून घेणे बाबत दक्षता घ्यावी. भविष्यात पदोन्नतीच्या अनुषंगाने येणा-या समस्येबाबत नंतर कोणतीही तक्रार घेतली जाणार नाही याबाबत आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे.

सदर प्राथमिक सेवाजेष्ठता यादी 2026 आक्षेप व हरकतीसह या कार्यालयास 15 दिवसाच्या आत प्रमाणपत्रासह सादर करण्यात यावी.

**सोबत - प्राथमिक सेवाज्येष्ठता सूची - 2026**

स्वाक्षरित/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
जिल्हा परिषद, नांदेड

**प्रतिलीपी,**

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)
जिल्हा परिषद, नांदेड करिता

**स्थळ प्रतीवर मा.उप.मु.का.अ.(साप्र.) यांची स्वाक्षरित असे**

Scanned with OKEN Scanner